| | | |
|---|---|---|
| सद्ररक्षाय<br>खलनिग्रहणाय | **जनसंपर्क अधिकारी पोलीस आयुक्तालय,<br>ठाणे शहर**<br>इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in<br>**भ्रमरध्वणी क्र.9819208279** | |

**प्रेसनोट** दि.०१.१०.२०२४

## ठाणे परिसरात महिलांकडून वेश्या व्यवसाय करवून घेण्यासाठी आणलेल्या दोन बळीत महिलांची गुन्हे शाखेकडून सुटका.

ठाणे शहर परिसरात पिडीत असहाय्य महिलांना पैशांचे आमिष दाखवून वेश्यागमनासाठी तयार करून वेगवेगळया ठिकाणी पाठविले जाते. ठाणे गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडील पोलीस पथकास मुलींची देह व्यापार रॅकेटची बातमी मिळताच पोलीस पथकाने छापा मारून एक महिला दलाल हिस ताब्यात घेवुन दोन बळीत महिलांची सुटका केली आहे.

ठाणे गुन्हे शाखेच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाचे वपोनि/चेतना चौधरी यांना गुप्त बातमी मिळाल्याने, दिनांक ३०.०९.२०२४ रोजी फाल्टन रेस्ट्रारंट ॲन्ड बार, कल्याण अंबरनाथ रोड, बॅक ऑफ बडोदाचे बाजुला, शांतीनगर, उल्हासनगर–३, येथे बनावट ग्राहक पाठवून सदर ठिकाणी पंच व पोलीस पथकाने छापा कारवाई करून सदर छाप्यात एक महिला दलाल नामे किरण अनिलकुमार राजदेव, वय ४० वर्ष, रा.उल्हासनगर, कल्याण मुळ गाव–पश्चिम बंगाल हिस ताब्यात घेवुन दोन बळीत महिलांची सुटका करून महिला दलाल हिचे विरूध्द मध्यवर्ती पोलीस स्टेशन गुन्हा रजि.क्र.। १०५४/२०२४ भारतीय न्याय संहिता १४३ (१), १४३(३) सह अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६ चे कलम ४ व ५ प्रमाणे दिनांक ०१.१०.२०२४ रोजी सकाळी ०८.१७ वा. गुन्हा दाखल करून कारवाई करण्यात आला आहे.

सदर कारवाई मा.वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्ष, गुन्हे शाखेचे वपोनिरी/चेतना चौधरी, पोउपनिरी/डी.व्ही.चव्हाण, श्रेणी.पोउपनि/एन.डी.क्षिरसागर, मसपोउपनिरी/कदम, सपोउपनि/वालगुडे, सपोउपनि/मोहीते, पोहवा/११५० के.बी.पाटील, मपोअंम/८१३१ खरात, मपोअंम/२१७ थोरात, मपोअंम/४६८४ चांदेकर, चापोशि/८१७२ गणेश आव्हाड यांनी यशस्वीपणे पार पाडलेली आहे.

( शैलेश साळवी )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर